वर्ष- १० | अंक- १० | मुंबई, मंगळवार, २३ जानेवारी ते २९ जानेवारी २०२४ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com



PG 2 शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक,

3 → लक्ष्य एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे

कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी? ← 4








## 'छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे मोदींनी..', गोविंदगिरी महाराजांचे भावुक विधान; म्हणाले, 'श्रीमंत योगी..'

**मुंबई। प्रतिनिधी,**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी आज राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा श्रीमान योगी असा उल्लेख केला. ते म्हणाले, 'अमूक एक परिवर्तन आणण्यासाठी एखाद्या महापुरुषाला स्वतःचे जीवन अपार्वे लागते. आज देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपाने एक आदर्श व्यक्ती लाभले. आज राम मंदिरात केवळ एका मूतीर्ची प्रतिष्ठापना झालेली नाही, तर या देशाची अस्मिता, स्वाभिमान आणि आत्मविश्वासाची पुन्हा प्रतिष्ठापना झाली आहे. ५०० वर्षांच्या प्रतिक्षेनंतर हे स्वप्न पूर्ण होत आहे.'

**पंतप्रधान मोदींनी तीन दिवसांऐवजी ११ दिवसांचा उपवास केला**

स्वामी गोविंददेव गिरी महाराज म्हणाले की, मला २० दिवसांपूर्वी निरोप मिळाला की, पंतप्रधान मोदी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या तयारीसाठी काय करावे लागेल, हे विचारत आहेत. त्यासाठी काय नियम आहेत, असे मला विचारले गेले. आपल्या देशात राजकीय पुढारी कधीही काहीही करतात. पण पंतप्रधान मोदींनी नियम जाणून घेण्याचा प्रयत्न केला. भारतातील सर्वोच्च आदर्श पुरूष प्रभू श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी काय करावे लागले, हे जाणून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

'पंतप्रधान मोदी यांनी केवळ तीन दिवसांचा उपवास करण्यास सांगितले होते. पण त्यांनी ११ दिवसांचा उपवास केला. एखाद्या राष्ट्रीय नेत्यांनी एवढा त्याग करणे सोपी गोष्ट नाही. तसेच दिव्य देशांचा प्रवास करावा असेही आम्ही सांगितले. मोदींनी नाशिकच्या पंचवटीपासून प्रवास सुरू केला ते कन्याकुमारीच्या रामेश्वरपर्यंत ते गेले. आम्ही तीन दिवस भूमिशयन करायला सांगतिले होते. पण या कडाक्याच्या थंडीत पंतप्रधान मोदी ११ दिवस भूमिशयन करत आहेत', असेही स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी सांगितले.

**छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणेच..**

'तप करणे ही भारताची परंपरा राहिली आहे. आज या ठिकाणी मला एका राजाची आठण होत आहे, ज्यात हे सर्व गुण होते, ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. लोकांना कदाचित माहीत नाही, ते स्वतः मल्लिकार्जुन ज्योतिलिंर्गाच्या दर्शनासाठी श्रीशेलम येथे गेले, तेव्हा त्यांनी तीन दिवसांचा उपवास केला. तीन दिवस शिवमंदिरात राहिले. महाराजांनी त्यावेळी सांगितले की, मला राज्य नाही करायचे. मला सन्यास घेऊन भगवान शिवाची सेवा करायची आहे. पण त्यांच्या ज्येष्ठ मंत्र्यांनी त्यांची समजूत घातली आणि राज्य करणे ही त्यांची सेवाच आहे, असे सांगितले', अशी आठवण गोविंददेव गिरी यांनी सांगितली.



**पंतप्रधान मोदी श्रीमान योगी...**

'आज मला स्वामी समर्थ महाराज यांचीही आठवण होत आहे. त्यांनी शिवाजी महाराजांचे वर्णन करताना म्हटले, 'निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निधार्रू। श्रीमंत योगी'. आज आपल्याला असाच एक श्रीमंत योगी प्राप्त झाला आहे', अशी भावना गोविंदगिरी महाराजांनी यावेळी व्यक्त केली.

## मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना, राज्यातील पोलिसांच्या सुट्ट्या रद्द; राज्य सरकार ॲक्शनमोडवर..



**मुंबई। प्रतिनिधी,**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे अखेर मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. आंतरवाली सराटीमधून निघालेल्या मनोज जरांगे यांच्यासोबत लाखोंचा जनसमुदाय देखील पाहायला मिळत आहे. त्यामुळे मुंबई आंदोलनावर जरांगे ठाम असल्याचे पाहायला मिळत आहे. आता आरक्षण घेतल्याशिवाय थांबणार नसल्याचे जरांगे म्हणाले आहेत. विशेष म्हणजे जरांगे यांच्या मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पोलिसांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे आंतरवाली सराटीमधून मुंबईकडे रवाना झाले आहे. त्यामुळे राज्यभरात देखील मराठा आरक्षणासाठी वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन होण्याची शक्यता लक्षात घेता, पोलिसांच्या सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहे. याबाबत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून पत्र काढण्यात आले आहे. ज्यात 20 जानेवारी ते 28 जानेवारीपर्यंत सर्व पोलीस अधिकारी, अमलदार यांच्या साप्ताहिक सुट्टीसह सर्व प्रकारच्या सुट्ट्या (वैद्यकीय रजा वगळून) रद्द करण्यास घटक प्रमुखांना मान्यता देण्यात आली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की, 'मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने जालना ते मुंबई असा संभाव्य पदयात्रा करणार आहेत. त्यामुळे त्यांच्या समर्थनार्थ राज्यात ठिकठिकाणी मोर्चे, आंदोलने करण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

त्या अनुषंगाने राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकरिता तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये या करिता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आवश्यक बंदोबस्तासाठी 20 जानेवारी ते 28 जानेवारी या कालावधीत खालील नमुद घटकांमधील सर्व अधिकारी व अंमलदार यांच्या साप्ताहिक सुट्टीसह सर्व प्रकारच्या रजा बंद करण्यास घटक प्रमुख यांना मान्यता देण्यात येत आहे. तसेच घटकातील साप्ताहीक सुट्टी बंद करताना उपरोक्त संदभार्तील शासन निर्णयाचे तंतोतंत पालन करावे. तरी, घटक प्रमुख यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकरिता सवोर्तोपरी दक्षता घ्यावी,असे म्हटले आहे.

## 'रामराज्य' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करुन दाखवलं' देवेंद्र फडणवीसांची विरोधकांवर खोचक टीका

**मुंबइे। प्रतिनिधी,**

अयोध्येतील प्रभू श्री राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमंत्रणावरून गेल्या काही दिवसांपासून विरोधी पक्षातील नेते भाजप सरकारवर टीका करत आहे. यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिउत्तर दिल आहे. दरम्यान, ठाण्यात रामायण महोत्सवाचं आयोजन देवेंद्र फडणवीस म्हणाले,' रामराज्य म्हणजे सुशासन, पारदर्शकता आणि वसुधैव कुटुंबकम याचा एकत्रित विचारच. कर्तव्य, श्रमप्रतिष्ठा, कर्मभाव, प्रयत्न वाद म्हणजे रामराज्य. रामराज्य म्हणजे की पंतप्रधान मोदींनी जी संकल्पना मांडली आहे ती दहशतवाद मुक्त भारत, गरिबीमुक्त भारत, घराणेशाही मुक्त भारत, आत्मनिर्भर



भारत, एक भारत श्रेष्ठ भारत या रामराज्याच्या संकल्पना आहेत असं फडणवीस यांनी म्हटलं आहे. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले,'आज या भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी दुर्जन शक्ती आहेत, दहशतवाद माजवत आहेत त्यांचा नायनाट करत आहे. आवश्यकता पडल्यास सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकही केले जातात आणि ३७० कलम हटवून दुर्जन शक्तींना सांगितलं जातं की भारताचे तुकडे तुम्हाला करु देणार नाही. रामराज्याची संकल्पनेवरच देशाचा कारभार सुरु आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हेच करुन दाखवलं. कोणत्याही जाती-धमार्चा विचार न करता गरीब कल्याणाचं काम केलं. राजीव गांधी म्हणायचे मी एक रुपया दिल्लीहून पाठवला की १५ पैसेच गरीबाला मिळतात बाकीचे पैसे व्यवस्था खाऊन टाकते. मात्र मोदींनी अशी व्यवस्था उभी केली जी गरीबाच्या खात्यात संपूर्ण एक रुपया जाईल. मोदींच्या राज्यात सरकारने दृढतेने सांगितलं की रामलल्लाच्या मूर्ती ठेवल्या आहेत तीच रामजन्मभूमी आहे. आम्हाला तिथेच मंदिर सापडलं आहे, आम्हाला तिथेच ६४ खांब मिळाले. त्याच ठिकाणी मूतीर्ही सापडल्या आहेत. त्याच ठिकाणी प्रभू रामाचं मंदिर आम्ही बनवणार हे सांगणारे मोदीजी होते आणि राम मंदिर समिती होती. त्यामुळे हा दिवस आपण पाहतो आहोत. असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर हल्ला बोल केला आहे.

## 'हिंदू मंदिरासाठी...', २२ जानेवारीच्या सुट्टीला विधी विद्यार्थ्यांकडून मुंबई उच्च न्यायालयात आव्हान

**नवी दिल्ली। प्रतिनिधी,**

अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारी रोजी श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी २२ जानेवारी रोजी अर्ध्या दिवसाची सुट्टी जाहीर केली. पाठोपाठ महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र या निर्णयाच्या विरोधात विधी शाखेच्या चार विद्यार्थ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाकडे याचिका दाखल केली आहे.

ज्याची सुनावणी रविवारी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. शिवांगी अग्रवाल, सत्यजित साळवे, वेदांत अग्रवाल आणि खुशी बंगिया या विधी शाखेच्या चार विद्यार्थ्यांनी सार्वजनिक सुट्टीच्या विरोधात याचिका दाखल केली आहे. विशेष खंडपीठाच्या




न्यायाधीश जीएस कुलकर्णी आणि निला गोखले यांच्या समोर उद्या (२१ जानेवारी) सुनावणी होईल. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गोव्यापाठोपाठ महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही येत्या २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा करण्यात आली. मात्र या सुट्टीला आक्षेप घेण्यात आला. धार्मिक कार्यक्रम साजरा करण्यासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करणे हे घटनेत समाविष्ट असलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारे आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने स्वतःला कोणत्याही धमार्शी जोडू नये किंवा कोणत्याही एका धमार्ला प्रोत्साहन देता कामा नये, असाही युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे. लाईव्ह लॉ या संकेतस्थळाने याबाबतचे वृत्त दिले आहे.

याचिकाकर्त्यांनी म्हटले की, हिंदू मंदिराच्या लोकार्पणानिमित्त सरकारने सोहळे साजरे करणे आणि या माध्यमातून एका विशिष्ट धमार्शी जोडून घेणे, हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांवर थेट घाला घालणारे कृत्य आहे. सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याबाबतचे धोरण राजकीय पक्षाच्या मजीर्नुसार असू शकत नाही. एखाद्या देशभक्त व्यक्तीच्या किंवा ऐतिहासिक महापुरुषांच्या स्मरणार्थ सुट्टी जाहीर केली जाऊ शकते. परंतु समाजाच्या विशिष्ट घटकाला किंवा धार्मिक समुदायाला खुश करण्यासाठी अशाप्रकारे सुट्टी दिली जाऊ शकत नाही.

मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती की, राज्य सरकारने येत्या २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी. राज्य मंत्रिमंडळाने ही मागणी मान्य केली आहे. राज्य सरकारने अधिकृत परिपत्रक काढून ही सुट्टी जाहीर केली आहे.

**सहा दिवस बँका बंद**

हजरत मोहम्मद अली यांच्या जयंतीनिमित्त २५ जानेवारी रोजी बँकांना सुट्टी असणार आहे. तर २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त सुट्टी आहे. त्यामुळे या दिवशीदेखील बँका बंद असतील. २७ जानेवारी रोजी या महिन्यातला चौथा शनिवार असल्याने याही दिवशी बँका बंद असणार आहेत. २१ आणि २८ जानेवारी रोजी रविवार आहे.

तर २२ जानेवारी रोजी राज्य सरकारने सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याचाच अर्थ २१ जानेवारी ते २८ जानेवारी या आठ दिवसांपैकी केवळ दोनच दिवस (२३, २४ जानेवारी) बँका सुरू असतील.

## १६० गुंतवणूकदारांचा विकासकाविरुद्ध गुन्हा दाखल




**पनवेल। प्रतिनिधी,**

तेरा वषार्नतरही रोहिंजन गावामध्ये हेक्ससीटी या खासगी महागृह प्रकल्पामधील १६० गुंतवणूकदारांना हक्काचे घर न मिळाल्याने सुप्रिम कन्स्ट्रक्शन डेव्हलपमेंट प्रा. लिमीटेड या विकासक कंपनी आणि त्यांच्या भागीदारांविरोधात तळोजा पोलिसांनी ४४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. तळोजा पोलिसांनी मुदतीमध्ये सदनिका न दिल्याने गुंतवणूकदारांचे हक्क ध्यानात घेता भारतीय दंडसंहिता १८६० च्या कलम ४०६, ४२० नुसार महाराष्ट्र मालकी हक्क सदनिका बांधण्यास प्रोत्साहन देणे, विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण या नियमांतर्गत ४४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याबद्दल ही कारवाई करण्यात केली आहे. गणेश बिस्ट व इतर गुंतवणूकदारांनी त्यांची फसवणूक सुप्रीम विकासक कंपनीने केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मागील १३ वर्षात रोहिंजन गावातील नरेंद्रकुमार भल्ला यांच्या १५ एकर जमिनीवर हेक्ससीटी बांधणार असल्याचे सांगून या महागृहनिर्माण प्रकल्पात १८०० सदनिका उभारणार असे गुंतवणूकदारांना सांगितले होते. मात्र प्रत्यक्षात अजूनही १६० गुंतवणूकदारांना त्यांचे हक्काचे घर न मिळाल्याने गुंतवणूदकारांनी पोलीस ठाण्यात कायदेशीर कार्यवाही करण्याचा मार्ग निवडला. २०१० साली ३० ते ४० लाख रुपयांमध्ये सदनिका बांधून देऊ असे गुंतवणूकदारांना सुप्रिम विकासक कंपनीने आश्वासित केले होते. गुंतवणूकदारांनी त्यासाठी बॅंकेतून कर्ज काढून आणि स्वतःजवळील जमविलेली रक्कम विकासक दिल्यानंतर सुद्धा सदनिका बांधून दिली नाही. मुद्रांक नोंदणी दस्त गुंतवणूकदारांसोबत केल्यानंतर या गृहप्रकल्पाचे नाव क्लॅनसीटी असे बदलण्यात आले. तसेच जमीन मालक भल्ला यांचे सुद्धा पैसे थकविल्याने भल्ला यांनी विकासकाविरोधात न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर न्यायालयाने जमीन मालक भल्ला यांच्यासोबत केलेल्या कराराची पुर्तता विकसक कंपनीने न केल्याने त्यांची बँक खाती गोठविली. विकासक कंपनीकडे जमिनीचा ताबा नसताना सुद्धा त्यांनी गुंतवणूकदारांकडून सदनिका बांधण्यासाठी आणि इतर कामांसाठी रक्कम घेतल्याने तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अविनाश काळदाते यांनी या प्रकरणी सुप्रिम विकासक कंपनीचे मानुला मेहबुल्ला काचवाला, ललित शाम टेकचंदानी, काजोल ललित टेकचंदानी, अरुण हसानंद मखीजानी तसेच सुप्रिम विकसक कंपनीचे माजी आणि विद्यमान संचालकांविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार, २३ जानेवारी ते २९ जानेवारी २०२४

# मुंबईत काळाचौकी परिसरात ६ सिलिंडरचा ब्लास्ट, शाळेत भीषण आग

**मुंबई। प्रतिनिधी,**
मुंबईच्या काळाचौकी परिसरात गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट होऊन आग लागल्याची घटना घडली आहे. मिंट कॉलनी परिसरातील एका शाळेत हा स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

सुदैवाने संक्रांतीची सुट्टी असल्याने शाळा बंद होती. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. शाळा बंद असल्याने कुठलीही जीवितहानी झालेली नाही. सध्या अग्निशमन दलाचे जवान या आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

काळाचौकी येथील मिंट कॉलनी परिसरात साईबाबा पथ संकुल शाळा आहे. या शाळेत तब्बल ६ सिलिंडरचे स्फोट होऊन



भीषण आग लागली. एकापाठोपाठ एक सहा स्फोटांचा आवाज आल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

या शाळेत एक लग्नाचा हॉल असल्याचीही माहिती आहे. याठिकाणी केटरींगचा व्यवसाय चालतो, त्यासाठी ही सिलिंडर तिथे ठेवले असून त्याचा स्फोट झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. सध्या अग्निशमन दलाच्या ४ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या असून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जवान शथीर्चे प्रयत्न करत आहेत.

# मुंबई पोलीसांनी राबवली विशेष मोहिम, ६६८२ वाहनांची तपासणी भरधाव वेगाने गाडी चालवल्याप्रकरणी ८५ गुन्हे



**मुंबई। प्रतिनिधी,**
मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांकडून राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत ६ हजार ६८२ वाहनांची तपासणी करण्यात आली. यावेळी विनाहेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या १८६९ दुचाकीस्वारांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय भरधाव वेगाने गाडी चालवल्याप्रकरणी ८५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.पोलीस आयुक्त विवेक फणसळकर व विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांच्या देखरेखीखाली विशेष मोहिम राबविण्यात आली.

या मोहिमे दरम्यान सर्व पोलीस ठाण्याच्या हददीत १०८ ठिकाणी नाकाबंदीचे करण्यात आली होती. यावेळी सहा हजार ६८२ वाहनांची तपासणी करण्यात आली आहे. विना हॅल्मेट (१८६९), दुचाकीवर तिघे प्रवास करणाऱ्यांवर (२५५), विरुध्द दिशेने वाहन चालविणाऱ्या एकुण १३८ वाहन चालकांवर मोटार वाहन कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच, मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या २० मद्यपी वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय भरधाव वेगाने वाहन चालवल्याप्रकरणी १५३ वाहने ताब्यात घेण्यात आली.

पश्चिम प्रादेशिक विभागाने भरधाव वेगाने वाहन चालवणाऱ्या विरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. वांद्रे रिक्लेमेशन, कार्टर रोड, पश्चिम द्रुतगती मार्ग, तसेच खेरवाडी जंक्शन, वांद्रे-कुर्ला कॉम्पलेक्स रोड, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड या परीसरात नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले. यावेळी एकुण ७७ गुन्हे नोंद करत १५३ वाहने ताब्यात घेण्यात आलेली आहेत. यापुढे देखील भरधाव वेगाने वाहन चालवून इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्यां विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा मुंबई पोलिसांनी दिला आहे.

# नागपाडा पोलीस रुग्णालयात पोलिसाची आत्महत्या



**मुंबई । प्रतिनिधी,**
नागपाडा पोलीस रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारून ३९ वर्षीय पोलिसाने शनिवारी आत्महत्या केली. ते स्थानिक सशस्त्र पोलीस-३ येथे कार्यरत होते. नुकतीच त्यांची माहिम पोलीस ठाण्यावरून तेथे बदली करण्यात आली होती.

कैलास एकनाथ गवळी असे मृत पोलिसाचे नाव आहे. माहिमवरून त्यांची वरळी येथील एल-३ विभागात कार्यालयात बदली करण्यात आली होती. त्या काळात ते ८९ दिवस गैरहजर असल्यामुळे तंदुरुस्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र मागण्यात आले होते. त्यासाठी त्यांना नागपाडा पोलीस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रविवारी ते रुग्णालयातील दुसऱ्या मजल्यावरील शौचालयात गेले. तेथील खिडकीतून त्यांनी खाली उडी मारली.

त्यात त्यांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यामुळे त्यांना जे.जे. रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान गवळी यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी नागपाडा पोलिसांनी गवळी यांच्या पत्नीचा जबाब नोंदवला आहे. गवळी यांची बदली माहिम पोलीस ठाण्यावरून सशस्त्र पोलीस दल ०३ विभाग वरळी येथे झाली होती. त्यासाठी ते १२ जानेवारीला वरळी सशस्त्र विभागात हजर होण्यासाठी गेले. त्यावेळी ते ८९ दिवस गैरहजर असल्यामुळे त्यांना नागपाडा पोलिसांकडून तंदुरुस्ती प्रमाणपत्राची मागणी करण्यात आली. त्यासाठी ते १२ जानेवारीला रुग्णालयात प्रमाणपत्र घेण्यासाठी गेले होते.

त्यावेळी त्यांना प्रमाणपत्रासाठी रुग्णालयात दाखल होण्यास सांगण्यात आले होते, असे त्यांच्या पत्नीने पोलिसांना सांगितले. त्यानंतर रविवारी गवळी यांनी रुग्णालयातून उडी मारली. याप्रकरणी नागपाडा पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# शरद मोहोळ खून प्रकरणातील मुख्य आरोपीला अटक, तपासात 'हे' महत्त्वाचे खुलासे

**पुणे। प्रतिनिधी,**
शरद मोहोळ खून प्रकरणात पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने रविवारी रात्री नवी मुंबई परिसरात कारवाई केली. मुळशीतील गुंड विठ्ठल शेलारसह रामदास मारणे यांच्यासह साथीदारांना नवी मुंबईत पकडले. गुन्हे शाखेच्या पथकाने मोहोळ खून प्रकरणात मुळशीतून चार जणांना ताब्यात घेतले. मोहोळ खून प्रकरणात मारणेसह आतापर्यंत १४ जणांना अटक करण्यात आली आहे. ५ जानेवारी रोजी कोथरुडमधील सुतारदरा परिसरात मोहोळवर पिस्तुलातून गोळीबार करून खून करण्यात आला होता. मोहोळचा साथीदार असलेल्या साहिल उर्फ मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी खून केला होता.



खून प्रकरणात दोन वकिलांना अटक करण्यात आली आहे.

खून प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलीस मुख्य सूत्रधाराचा शोध घेत होता. मुळशीतील गुंड विठ्ठल शेलार, रामदास मारणे नवी मुंबई परिसरातील एका फार्म हाऊसवर असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली. पोलिसांच्या पथकाने शेलार, मारणे यांच्यासह सहा जणांना नवी मुंबईतून ताब्यात घेतले. मुळशी तालुक्यातून चार जणांना ताब्यात घेण्यात आले.

शरद मोहोळचा खून करण्यापूर्वी मुळशीतील हडशी गावात मुख्य आरोपी मुन्ना पोळेकर आणि साथीदारांनी गोळीबाराचा सराव केला होता. मध्यरात्री झाडाच्या बुंध्यावर पोळेकर आणि साथीदारांनी पिस्तुलातून गोळ्या झाडून सराव केला. याप्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, पौड पोलीस ठाण्यात तपासासाठी सोपविण्यात आले आहेत. साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर (वय २०, रा. सुतारदरा, कोथरुड), नामदेव महिपती कानगुडे (वय ३४, रा. भूगाव आणि कोथरुड), सतीश संजय शेडगे (वय २८, रा. स्वप्नशिल्प अपार्टमेंट, माथवाडी फाटा, भूगाव), आदित्य विजय गोळे (रा. गोळे आळी. पिरंगुट), नितीन अनंता खैरे (रा. नंदनवन सोसायटी, कोथरुड) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. मोहोळच्या खुनाच्या कटात सामील होण्यास नकार दिल्याने पोळेकर आणि कानगुडे यांनी अजय सुतार यांनी डिसेंबर महिन्यात भूगाव परिसरात अजय सुतार याच्यावर पिस्तुलातून गोळीबार केला होता.

# न्हावा शेवा बंदरावरून १० कोटींच्या परदेशी सिगारेट जप्त



**मुंबई। प्रतिनिधी,**
दुबईहून न्हावा शेवा बंदरात आणलेल्या कंटेनरमधून १० कोटी रुपयांच्या परदेशी सिगारेटचा साठा जप्त करण्यात महसूल गुप्तवार्ता संचलनालयाला (डीआरआय) यश आले आहे. कार्पेटच्या नावाखाली सिगारेटची तस्करी करण्यात येत होती. याप्रकरणी डीआरआय अधिक तपास करत आहे.

न्हावा शेवा बंदरात विदेशी सिगारेटचा साठा येणार असल्याची माहिती डीआरआयच्या मुंबई पथकाला मिळाली. त्यानुसार, पथकाने शोध मोहीम राबवली. यादरम्यान चायनीज व्हिस्कोस कार्पेट म्हणून घोषित केलेल्या मालामध्ये असलेला विदेशी सिगारेटचा साठा जप्त करण्यास यश आले. त्यात जवळपास ६७ लाख २० हजार सिगारेट जप्त करण्यात आल्या आहेत. त्यांची किंमत १० कोटी आठ लाख रुपये आहे. दुबईच्या जेबेल अली बंदरावरून सिगारेटचा साठा न्हावा शेवा बंदरात पाठवण्यात आला होता. त्यात कोरियामध्ये तयार केलेल्या सिगारेटचा समावेश आहे. केंद्रीय यंत्रणांपासून लपविण्यासाठी तस्करांनी कागदोपत्री कार्पेट असल्याचे घोषित केले होते. याबाबत डीआरआय अधिक तपास करत आहे.

# देवदर्शनाला नेण्याच्या बहाण्याने पत्नीचा दरीत ढकलून खून; अटकेनंतर कारण सांगत आरोपी पती म्हणाला...

**पुणे। प्रतिनिधी,**
पत्नीला देवदर्शनाच्या बहाण्याने सातारा जिल्ह्यातील मांढरदेवीत परिसरात नेल्यानंतर तिचा दरीत ढकलून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पत्नीला दरीत पडल्यानंतर ती झाडात अडकली. त्यानंतर तरुणाने साडीने तिचा गळा आवळून खून केल्याचे उघडकीस आले असून, तरुणाला लोणीकंद पोलिसांनी अटक केली आहे. ललिता अमोलसिंग जाधव (वय ३६, रा. भैरवनाथ मंदिराजवळ, फुलगाव, ता. हवेली, जि. पुणे) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी पती अमोलसिंग मुरली जाधव (वय २६) याला अटक करण्यात आली आहे. पोलीस हवालदार प्रताप आव्हाळे यांनी याबाबत लोणीकंद पोलीस



ठाण्यात फिर्याद दिली आहे. अमोलसिंगने पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात दिली होती. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत होता. अमोलसिंगने दिलेल्या माहितीनुसार पोलीस बेपत्ता झालेल्या ललिताचा शोध घेत होते. त्यानंतर पोलिसांना तपासात महत्त्वाची माहिती मिळाली. चौकशीसाठी त्याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसी खाक्या दाखविताच त्याने पत्नीच्या खुनाची कबुली दिली. अमोलसिंगने कुटुंबीयांच्या दबाबामुळे वयाने मोठी असलेल्या ललिताशी विवाह केला होता. दोघांमध्ये दहा वर्षांचे अंतर होते. त्याचे पत्नीशी वाद व्हायचे. वयाने मोठी असल्याने पत्नीला त्याने सोडचिठ्ठी देण्यास सांगितले होते. मात्र, ललिताने सोडचिठ्ठी देण्यास नकार दिल्याने तो तिच्यावर चिडला होता.

त्यांच्यात कायम वाद व्हायचे. २८ ऑक्टोबर २०२३ रोजी भाडेतत्त्वावर मोटार घेऊन दोघे जण सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी येथे दर्शनासाठी निघाल्याचे सांगून बाहेर पडले.

# नवी मुंबईत बांधकाम व्यावसायिकाची हत्या, पत्नी आणि वाहन चालक आरोपी, वाहन चालकास अटक



**नवी मुंबई। प्रतिनिधी,**
सिवूड्स सेक्टर ४४ मधील अमन बिल्डर्स या कार्यालयात बांधकाम व्यावसायिक मनोज सिंग यांची डोक्यात लोखंडी सळई घालून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी चोवीस तासांच्या आत छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. मृत मनोज सिंगकडे असणारा वाहन चालक आणि सिंग यांच्या पत्नीने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. तसेच वाहन चालकाला अटक करण्यात आले असून त्याच्या पत्नीलाही लवकरच अटक करण्यात येणार आहे. शनिवारी सिवूड्स सेक्टर ४४ येथील अमन डेव्हलपर्सच्या मनोज सिंग नावाच्या बांधकाम व्यावसायिकाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात त्यांच्याच कार्यालयात आढळून आला होता. सकाळी नेहमी प्रमाणे कार्यालयात काम करणारे आल्यावर ही बाब उघड झाली होती. याबाबत माहिती मिळताच पोलीस उपायुक्त विवेक पानसरे, सहाय्यक आयुक्त राहुल गायकवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल हे पथकासह घटनास्थळी आले होते. मृतदेहाची अवस्था पाहता सुरुवातीला हत्या गोळी घालून करण्यात आली, असा प्राथमिक अंदाज पोलिसांना होता.मात्र नंतर हत्या गोळी घालून नव्हे तर अन्य जड वस्तू डोक्यात घालण्यात आल्याने झाली असल्याचे तपासादरम्यान समोर आले. पोलिसांनी सिंग यांच्याशी संबंधित सर्वांची कसून चौकशी सुरु केल्यावर त्यांचा वाहन चालक शमहोद्दीन खान याला समर्पक उत्तरे देता आली नाही.

त्यामुळे त्याला ताब्यात घेत थेट पोलीस ठाण्यात आणण्यात आले. या ठिकाणी पोलिसांनी कसून चौकशी केल्यावर त्याने हत्या केल्याची कबुली दिली तसेच यात मृत सिंग यांच्या पत्नीचाही समावेश असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्या पत्नीची चौकशी केल्यावर तिनेही सहभागी असल्याबाबत माहिती दिली. खान याला अटक केल्यावर रविवारी विशेष न्यालयालयासमोर हजर केले असता १८ जानेवारीपर्यंत त्याला पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे.

मनोज सिंग यांच्या पत्नीचे आणि त्यांचे पटत नव्हते. सिंग यांना काही वर्षांपूर्वी फसवणूक प्रकरणी अटक करण्यात आली होती. चार महिने ते कारागृहात असताना त्यांची पत्नी व वाहन चालक आणि पडेल ते काम करणारा खान यांच्यात जवळीक निर्माण झाली होती.

Receipt No. 1328721 (1)/2024/MBMC-WATER SUPPLY (Computer No. 1328721)

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
Water Supply & Sewerage Department
Indira Gandhi Bhavan, Chatrapati Shivaji Maharaj Marg,
Bhayandar (W) 401101, Tal. Dist. Thane 28192828

**No. MNP/WS & Sew/37/2023-24** **Date –19/01/2024**

**//Re Tender Notice //**

Mira Bhayander Municipal Corporation's Water Supply Department has invited the re-tender for various works under water supply. The tender documents are available on www.mahatenders.gov.in website form 23/01/2024 to 30/01/2024 till 12.00 hrs. Tender shall submitted on www.mahatenders.gov.in website on or before 30/01/2024 upto 1.00 hrs.

**Ref No. MBMC/PRO/E-1328721/2023-24**
**Date – 19/01/2024**

**(Deepak Khambit)**
**City Engineer**
**Mira Bhayander Municipal Corporation**

**Place :**-Bhaindar
**Date :**-19/01/2024

**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रभाग समिती डी आचोळे, नालासोपारा (पु)**
**दुरध्वनी क्रं. ७२१९३७०००६ / ७२१९३७०००९**

**जावक क्र. वविशम /कवि/१०९/२०२३-२४**
**दिनांक -१६/०१/२०२४**

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी कार्यालय आचोळे नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. क्र. | रिसीट | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे नाव किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | आचोळे-९/२ | ४६६/४१ | ४१७८ | दुर्योधन के. सपकाळ | श्रत्रुघ्न प्यारेलाल राय व रिता श्रत्रुघ्न राय |
| २ | आचोळे-१० | ५२/२१ | ४१९२ | कुमारी एल्की सी. रिमेडीअस | कुमारी सम्राज जोनराज व वेंनीला कुमार |
| ३ | आचोळे-१० | २०/१० | ४१९४ | मधुवन बिल्डर्स | सीताराम कीशेन वर्मा व राजेश सीताराम वर्मा |
| ४ | माणिकपूर-२/३ | AC२१/४६०५० | ४२०२ | साजिद पटेल | रोझोलिया अन्नी जॉर्ज व जॉन जॉर्ज |
| ५ | आचोळे-०२ | २७३/५२ | ४२०५ | रमेश वल्लभ काफलिया | संतोष कुमार |
| ६ | आचोळे-०६ | १४९/१ | ४२०८ | वैष्णवी डेव्ह | परेश पद्माकर आयरे व गितांजली परेश आयरे |
| ७ | आचोळे-०२ | ४९/१८ | ४२०९ | आशा देवी | सतिश कुमार सक्सेना |
| ८ | आचोळे-९/१ | ४५०/३५ | ४२११ | धर्मदिप बिल्डर्स | भगवान जी. मकवाना |
| ९ | आचोळे-०५ | १६४/१३ | ४२१२ | अलाउद्दीन अलिहुसैन मंडल | महाबुल मल्लीक व मुमताज महाबुल मल्लीक |
| १० | आचोळे-०५ | १०३/७ | ४२१४ | अनमोल डेव्हलपर्स | समीर संदीप राणे व संदीप सदाशिव राणे |
| ११ | आचोळे-९/१ | ६६९/२२२ | ४२१८ | उमर अकबर खान | संदीप चंद्रकांत निचळ व संध्या संदीप निचळ |
| १२ | आचोळे-०९ | ६५९/१८ | ४२१९ | आकाश राजेंद्र गायकवाड | आशा दीपक इंगळे |
| १३ | आचोळे-१० | ४३/११ | ४२२० | रामानंद शहा | कार्तिका चंद्रा साहु व श्रीकांता साहु |
| १४ | आचोळे-९/२ | ६६०/८० | ४२२२ | सोनी आशुतोष कुमार व आशुतोष कुमार | नितेश मनोज कंसारा व भावना मनोज कंसारा |
| १५ | आचोळे-९/२ | ४६५/५ | ४२२३ | सुरेंद्र पी. शिर्के | सुर्वणा प्रकाश तांबे |
| १६ | आचोळे-०४ | २५/७ | ४२२४ | रेणूका बी गावीत | साक्षी कृष्णा घाग व कृष्णा परशुराम घाग |
| १७ | आचोळे-९/२ | ७९०/१५१ | ४२२६ | नंद किशोर प्रसाद सिंह | संदीप सरजू गुप्ता व गणेश सरजू गुप्ता |
| १८ | आचोळे-०८ | ९४/४५ | ४२२९ | प्रीती एच भईया | जयंती अर्जुन सोधंर्वा |
| १९ | आचोळे-१० | ३४५/५५ | ४२३१ | अनंतमुर्ती भट | प्रभावती स्वामीनाथन व सुप्रिया स्वामीनाथन |
| २० | माणिकपूर-२/३ | AC २१/३६७२२ | ४२३२ | झेवियर लूईस नैकर | विश्वेश्वर रामदास जाधव |

वसई - विरार शहर महानगरपालिका जि. पालघर

**सही /-**

**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती 'डी', आचोळे**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

25 x 16 cm

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार, २३ जानेवारी ते २९ जानेवारी २०२४


# संपादकीय... अस्वस्थ इराणचे रण



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

पश्चिम आशियातील युद्धाची व्याप्ती वाढत असून आता पाकिस्तानही त्यात ओढले गेल्याने जगाचीही चिंता वाढली आहे. या संघर्षाच्या आवतार्तून आर्थिक प्रश्न बिकट होऊ शकतात. हा भडका थांबविण्यासाठी पुढाकार घेऊ शकेल, अशा समर्थ आणि नैतिक अधिकार असलेल्या शक्तीची गरज जगाला सध्या प्रकषार्ने जाणवत आहे. जे शस्त्रसज्ज आणि बलवान आहेत त्यांच्याकडे नैतिक धोरणाचा अभाव आहे, तर ज्यांच्याकडे नैतिकता शिल्लक आहे, त्यांच्याकडे पुरेशी शक्ती नाही, अशी ही कोंडी आहे. इस्त्राईल-हमास यांच्यातील युद्धाला तोंड फुटले त्याला शंभरवर दिवस उलटले तरी त्याची धग कायम आहे. महिनाभरापासून लाल समुद्रात हौथी बंडखोरांनी व्यापारी जहाजांवरील हल्लासत्राने जहाजवाहतूक विस्कळीत झाली आहे. हौथींच्या उचापती सुरू असतानाच त्यांना बळ देणाऱ्या इराणने पाकिस्तान, सीरिया आणि इराकमधील भूभागांवर क्षेपणास्त्रे डागली; ड्रोनहल्ल्यांनी विरोधकांना धडा शिकवला. गेल्या सहा-आठ महिन्यांपासून पाकिस्तानस्थित 'जैश अल-अद्ल' या दहशतवादी गटाच्या कारवायांनी इराणच्या पोलिसांचा बळी घेतला आहे.

इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड'चे जनरल कासीम सुलेमानींना आदरांजली वाहण्याच्या तीन जानेवारी रोजीच्या कार्यक्रमावेळी आत्मघातकी बाँबहल्ला झाला. त्यानंतर इराणने पाकिस्तानातील बलुचिस्तानमधील सिसतान, पिंजगुर भागातल्या जैश अल-अद्ल या सुन्नी दहशतवादी संघटनेच्या तळावर हल्ला केला. त्यामुळे चवताळलेल्या पाकिस्तानने इराणमधील राजदूताला परत बोलवले; तसेच इराणच्या मायदेशी गेलेल्या राजदूताला पाकिस्तानात न येण्याचा सल्ला दिला. सध्या पाकिस्तानात काळजीवाहू पंतप्रधान कारभार पाहात असून, निवडणुका तोंडावर आहेत. अशा स्थितीतही पाकिस्तानने प्रत्युत्तरादाखल इराणच्या सारवान शहर आणि परिसरावर क्षेपणास्त्र व ड्रोनहल्ले केले. पाकिस्तानातील फुटिरतावादी 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' आणि 'बलुचिस्तान लिबरेशन फोर्स' यांना इराण खतपाणी घालत असल्याने हल्ला केल्याचा पाकिस्तानचा दावा आहे.

एकमेकांच्या भूभागांत शिरून केलेल्या या कारवाईने इराण-पाकिस्तान संबंध किती ताणले जातात आणि यात कोणकोण उडी घेते, हे पाहावे लागेल.पाकिस्तानआधी इराणने सीरियातील इदलीबवर क्षेपाणास्त्रे डागली; अफगाणिस्तानातून हल्ले चढवणाऱ्या इस्लामिक स्टेटच्या खोरासन गटाला तेथे प्रशिक्षण दिले जात असल्याचा त्याचा दावा आहे. त्याचवेळी इराणने इराकमधील कुर्दिस्तानातील एरबिलवरही हल्ला चढवला. तेथे इस्त्राईली गुप्तचर संस्था मोसादचे प्रशिक्षण केंद्र आणि तळ आहे; तेथेच मोसादची कटकारस्थाने शिजतात, असाही इराणचा आरोप आहे. अणुकार्यक्रमामुळे आधीच आर्थिक आणि सामाजिक समस्यांना, देशांतर्गत नाराजीला तोंड देणाऱ्या इराणने ही कारवाई केली असावी. इस्त्राईल-हमास युद्धामुळे हिजबुल्लासह इतर गटांकडून इराणवर सक्रियतेसाठी दबाव वाढत आहे. त्याचा परिपाक म्हणजे इराणचे हल्लासत्र. महिनाभरापूर्वी इस्त्राईलने हमासच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देतानाच सीरिया, लेबनानसह इराणच्या लष्करी अधिकाऱ्यांना लक्ष्य करून कारवाईचा दणका दिला होता. त्यामुळेच इस्त्राईलच्या कारवाईला रोखण्यासाठी, गाझा पट्टीतील पॅलेस्टिनींना दिलाशासाठी इस्त्राईलविरोधकांनी दबावाचे सत्र अवलंबले आहे.

येमेनमधील हौथी, लेबनानमधील हिजबुल्ला तसेच सीरिया, इराकमधील विविध गट या दबावतंत्रात सामील आहेत. ते पॅलेस्टिनींशी एकनिष्ठतेच्या प्रदर्शनासाठी हल्ले करत आहेत. येमेनला मानवतावादी भूमिकेतून मदतीसाठी दोन वर्षांपूर्वी अमेरिकेने हौथींना दहशतवाद्यांच्या यादीतून बाहेर काढले होते. त्याच अमेरिकेने आता हौथींना पुन्हा दहशतवाद्यांच्या यादीत टाकण्याची तयारी चालवली आहे. अर्थात शिया विरुद्ध सुन्नी हीदेखील या सगळ्या घटनांना किनार आहेच. विशेषतः सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती या परंपरागत स्पर्धकांवर कुरघोडी आणि आखातातील राजकारणावर आपल्या वर्चस्वासाठी इराणने बेटकुळ्या काढणे चालवलेले दिसते. अशांत लाल समुद्रामुळे तेथील वाहतुकीसमोर अडचणींचा डोंगर आहे. लाल समुद्रातील वाहतूक केप ऑफ गुड होप कडून वळवली आहे. त्यामुळे वाहतूकखर्च आणि त्यासाठीचा कालावधी, जहाजांचा विमा हे सगळेच वाढले आहे.

# लक्ष्य एक ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे

कोविडच्या तडाख्यानंतर सावरत असताना एम. के. स्टॅलिन यांनी तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली. सूत्रे हाती घेतल्याबरोबर राज्याला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था करणे आणि त्यातून ४६ लाख नवे रोजगार देण्याचे लक्ष्य त्यांनी ठेवले.

जागतिक गुंतवणूकदारांच्या परिषदेत विविध प्रकल्पांच्या माध्यमातून उद्योजकांनी राज्यात सहा लाख कोटींची गुंतवणूक करण्याचे तत्त्वतः मान्य केले. तमिळनाडूच्या राजकारण आणि समाजकारणात गेल्या दहा वर्षातील दोन तारखांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पाच डिसेंबर २०१६ आणि ७ ऑगस्ट २०१८. या तारखांना अनुक्रमे मुख्यमंत्री जयललिता आणि माजी मुख्यमंत्री एम. करुणानिधी यांचे निधन झाले आणि तब्बल २७ वर्षे राजकीय पटलावर सुरू असलेला पारंपरिक संघर्ष संपुष्टात आला.

हा संघर्ष संपुष्टात येत असताना तमिळनाडू राज्य अस्थिरतेच्या उंबरठ्यावर उभे राहिले. सत्तेचा खेळ सुरू झाला. आधी पनिरसेल्वम आणि त्यानंतर ई. के. पलानीस्वामी राज्याचे मुख्यमंत्री झाले. पलानीस्वामी यांनी तमिळनाडूचे राज्यशकट हाकले खरे; मात्र त्यांची बरीचशी ताकद ही पक्षांतर्गत कुरबुरी आणि राजकीय कुरघोड्यांतच खर्ची पडली. या कालावधीमध्ये राज्यापुढील समस्या वाढल्या, राज्याच्या विकासाला ब्रेक लागला आणि बेरोजगारीचा प्रश्नही मागे पडला. पाच वर्षे पूर्ण झाली आणि विधानसभा निवडणूक जाहीर झाली. अण्णा द्रमुक आणि द्रमुक हे दोन पारंपरिक पक्ष पुन्हा एकदा समोरासमोर उभे ठाकले.

अण्णा द्रमुककडून पनीरसेल्वम आणि द्रमुककडून करुणानिधीपुत्र एम. के. स्टॅलिन मैदानात उतरले. तमिळनाडूच्या विकासाला गती द्यावयाची असेल आणि बेरोजगारांच्या हाताला काम द्यायचे असेल तर द्रमुकला संधी द्या, असे आवाहन करत स्टॅलिन यांनी राज्यभर प्रचाराची राळ उडविली आणि १३३ जागा जिंकत सत्ता काबीज केली. सात मे २०२१ रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर दोनच महिन्यात चेन्नईमध्ये राज्य शासनाच्या उद्योग मंत्रालयाच्यावतीने गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात आले. देशभरातील उद्योगपतींना राज्यात गुंतवणुकीसाठी आवाहन केले गेले.


चेन्नईमधील परिषदेमध्ये त्यांनी २०३० पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर पोहचवण्याचे आणि तमिळनाडूला दक्षिण आशियातील सर्वोत्तम राज्य बनविण्याचे ध्येय असल्याचे स्पष्ट केले. राज्यात २३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आणणे आणि त्या माध्यमातून ४६ लाख नवे रोजगार निर्माण करण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय त्यांनी ठेवले. कोरोनामुळे अनेक उद्योगांना घरघर लागली होती, अनेक छोटे-छोटे व्यवसाय बंद पडले होते, शहरांतून काम करणारे कामगार गावांकडे परतले होते. त्या सर्वांना पुन्हा कामावर आणण्यासाठी उद्योगांना आर्थिक सहकार्य करण्याची घोषणा केली. नव्या उद्योगांना चालना देण्यासाठीही सहकार्य देऊ केले. पर्यटनवाढीसाठी योजना जाहीर केली. माध्यान्ह पोषण आहार योजनेचा विस्तार केला. रानीपतमध्ये चप्पल तयार करण्याचा कारखाना सुरू करण्यासाठी ४०० कोटींचा निधी जाहीर केला. या कारखान्यातून २० हजार जणांना रोजगार उपलब्ध होईल, असा दावा केला जात आहे. याबरोबरच नवी पूनमअल्ली येथे १४० एकरावर चित्रनगरी उभारण्याची घोषणा करताना त्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली. ग्रामीण भागातील तरुणांमध्ये कौशल्य विकासासाठी विशेष पावले टाकण्यात आली.

...आणि ओघ वाढला



उद्योजकांना विविध सवलती देण्याचा आणि सहकायार्चा शब्द दिल्यामुळे देशातील मोठ-मोठे उद्योजक तमिळनाडूकडे आकर्षित झाले आहेत. त्याचे बोलके चित्र राज्यात नुकत्याच झालेल्या जागतिक गुंतवणूक परिषदेमध्ये दिसून आले. विविध कंपन्यांनी मिळून तमिळनाडूमध्ये सहा लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले. राज्याचा उद्योग विभाग आणि भारतीय उद्योग महासंघ यांनी या परिषदेचे आयोजन केले होते.

# असंघटित कामगार उपेक्षेचे धनी !



असंघटित कामगारांचे तब्बल ९३ टक्क्यांच्यावर असलेले प्रमाण पाहता, एवढ्या मोठ्या कामगार वर्गाच्या वेतन, वेतनेतर लाभ आणि सामाजिक सुरक्षा उपायांची योग्य ती खबरदारी घेणे आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आहे. देशातील एकूण कामगारांपैकी उत्पादनाच्या क्षेत्रात मूलभूत भूमिका बजावणारा असंघटित कामगार अजूनही धोरणात्मक प्रक्रियेतील काहीसा दुर्लक्षित घटक असल्याचेच दिसते. खासगीकरणाच्या वेगाने होणाऱ्या प्रक्रियेमुळे देशाच्या विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या कायम आणि संघटित स्वरुपाकडून कंत्राटी, रोजंदारीवरील तात्पुरत्या किंवा विनाअनुदान अशा असंघटित स्वरूपाकडे वेगाने होणाऱ्या रुपांतरामुळे देशातील श्रमशक्तीसमोर रोजगार आणि वेतनाचे असंख्य प्रश्न आ वासून उभे राहत आहेत. असंघटित कामगारांचे तब्बल ९३ टक्क्यांच्यावर असलेले प्रमाण पाहता, एवढ्या मोठ्या कामगार वर्गाच्या वेतन, वेतनेतर लाभ आणि सामाजिक सुरक्षा उपायांची योग्य ती खबरदारी घेणे आर्थिक विकासासाठी महत्त्वाचे आहे. मात्र आजही देशातील असंघटित कामगारांसमोरील वेतन आणि वेतनेतर लाभाचे प्रश्न सुटलेले नाहीत. केंद्र सरकारने २०१९ मध्ये वेतन अधिनियम २०१९ लागू केला असून कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा उपायांच्या अनुषंगाने विविध योजनादेखील सुरु केलेल्या आहेत. मात्र, प्रभावी अंमलबजावणीअभावी त्याचे निर्धारित लाभ या कामगारवर्गापर्यंत पोहोचत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

केंद्र सरकारद्वारे प्रकाशित केल्या जाणाऱ्या २०२१-२२ च्या नियमित श्रमशक्ती अहवालानुसार देशातील स्वयं-रोजगार आणि किरकोळ स्वरूपाच्या कामगारांच्या प्रमाणात वाढ झाली असून, सध्या देशात स्वयं-रोजगारावरील कामगारांचे प्रमाण ५५.८ टक्के इतके तर किरकोळ कामगारांचे प्रमाण २२.७ टक्के एवढे आहे. ग्रामीण भागातील या कामगारांचे प्रमाण अनुक्रमे ६१.५ टक्के आणि २६ टक्के एवढे लक्षणीय असल्याचे चित्र आहे.

यावरून देशात स्वयं-रोजगार आणि किरकोळ अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांचे एकूण प्रमाण हे ७९ टक्क्यांच्या जवळपास असून त्यांचे वेतन हे किमान वेतनपातळीपेक्षा कमी आहे. तर उर्वरित १४ टक्के कामगार नियमित वेतनावर काम करणारे असले तरी त्यांची वेतनपातळी किमान वेतनपातळीपेक्षा फार अधिक आहे, असे म्हणता येणार नाही. नियमित श्रमशक्ती अहवालात (२०२१-२२) कामगारांच्या नमूद केलेल्या मिळकतीचा विचार करता, ग्रामीण भागातील स्वयं-रोजगारावरील कामगारांचे मासिक सरासरी वेतन केवळ ८.१ हजार तर शहरी भागातील अशा कामगारांचे वेतन १३ हजार रुपयांच्या घरात आहे.

दुसरीकडे, देशाच्या ग्रामीण भागातील किरकोळ कामगारांची दैनिक सरासरी मजुरी ३२४ रुपये तर शहरी भागातील कामगारांची ३९५ रुपये एवढी असल्याचे चित्र आहे. या कामगारांच्या मासिक वेतनाचा विचार करता, ते १० हजार रुपयापेक्षा जास्त नसल्याचे स्पष्ट आहे. यावरुन देशाच्या ग्रामीण असो की शहरी असंघटीत कामगारांना मिळणारे वेतन हे किमान वेतन पातळीपेक्षा खूप असल्याचे पाहायला मिळते. दुसरीकडे, खुद्द केंद्र आणि राज्य सरकारद्वारे राबविल्या जाणाऱ्या म.गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील (मनरेगा) कामगारांची सरासरी दैनिक मजुरी रु. २३७.४५ एवढी असल्याचे तर केंद्र सरकारनिर्धारित शेतमजुरांची सरासरी दैनिक मजुरी रु. ३१२ इतकी आहे. याशिवाय बांधकाम, कारखाने, दुकाने, हॉटेल याठिकाणी रोजंदारीवर काम करणारे कामगार असोत वा शैक्षणिक क्षेत्रात तासिका तत्वावर काम करणारे शिक्षक सर्वांना मिळणारे सरासरी वेतन प्रतिमहिना १० ते १२ हजारांच्या घरात असून किमान वेतनपातळीपेक्षा कमी असल्याचेच दिसून येते. त्यातच या कामगारांनी केलेल्या अतिरिक्त कामाची ना कुठे नोंद ठेवली जाते ना त्या कामाची अतिरिक्त मजुरी मिळते. पेन्शन, पगारी रजा, विमा यासारखे सामाजिक सुरक्षा उपाय तर दूरच.

वास्तविकतः अर्थव्यवस्थेच्या निरनिराळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारवगार्ला योग्य प्रमाणात वेतन व वेतनेतर लाभ मिळावेत, यादृष्टीने सरकारी पातळीवर वेळोवेळी कामगार कायदे आणि अधिनियम करण्यात आलेले आहेत. २०१९ मध्ये केंद्र सरकारने देशातील कामगारांसाठी लागू केलेल्या वेतन अधिनियम (हाँ उड्ढीं), २०१९ नुसार, कोणत्याही क्षेत्रातील रोजंदारी, कंत्राटी, किंवा कायमस्वरूपी असलेल्या कुशल, अर्ध-कुशल किंवा अकुशल अशा सर्व प्रकारच्या कामगारांना किमान वेतन समितीने निर्धारित केलेल्या किमान वेतनापेक्षा कमी वेतन देण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, जे कामगार आपल्या निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ काम करत असतील त्यांना अतिरिक्त वेळेचा मोबदला देण्यात यावा, अशीही तरतूद आहे. प्रत्यक्षात असे होताना दिसत नाही. कामगार कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीअभावी असंघटित कामगारांचे वेतन हे किमान वेतनपातळीपेक्षा कमी असतेच; शिवाय अतिरिक्त कामाची नोंदही होत नाही, हे खरे.

राहणीमान खचार्चा विचार

देशातील विविध राज्ये कुशल, अर्धकुशल आणि अकुशल अशा विविध प्रकारच्या कामगारांसाठी राहणीमानखचार्ची पातळी लक्षात घेऊन किमान वेतनपातळी निश्चित करत असतात. यामध्ये महाराष्ट्राची किमान वेतनपातळी पाहता, ती १२ हजार ते १३ हजार रुपयांच्या दरम्यान असल्याचेच दिसून येते. मात्र अशा प्रकारे किमान वेतनपातळी निर्धारित करत असताना कामगारांच्या वास्तव राहणीमान खचार्चा विचार केला जातो का, हा प्रश्न आहे. परिणामी कामगारांना मिळणारे वेतन आणि राहणीमानखर्च यातील तुटीचा कायम सामना करावा लागतो. एकीकडे, देशातील तब्बल ९३ टक्क्यांच्यावर प्रमाण असलेल्या कामगारवर्गाच्या वेतन पातळीचे असे वास्तव असताना दुसरीकडे संघटित कामगार असोत की जनसेवक म्हटले जाणारे आमदार, खासदार असोत; त्यांना मिळणाऱ्या वेतन आणि वेतनेतर लाभांचे प्रमाण भरघोस असून ठराविक कालखंडानंतर त्यात वाढ करण्याची कायदेशीर तरतूद असल्याचेही पाहायला मिळते. तर विविध क्षेत्रांतील उद्योग आणि व्यवसायसंस्था हजारो कोटींच्या नफ्याची उच्चांकी नोंद करत असताना तो नफा शेवटच्या कामगारापर्यंत झिरपत नाही, हेही कटू सत्य आहे. खरंतर आज भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश म्हणून पुढे येत असताना हाताला काम मागणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत आहे.

अशा स्थितीत या कामगारांच्या हाताला दिले जाणारे काम आणि मिळणारे वेतन व वेतनेतर लाभ हे समन्यायी राहतील, याची काळजी घेणे गरजेचे आहे. याचे कारण कामगार हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील मूलभूत घटक असून श्रमाचा योग्य मोबदला मिळत असेल तर श्रमाची उत्पादकता आणि उत्पादनवाढ होऊन आर्थिक विकासाची प्रक्रिया गतिमान होण्यास मदत होते.


## वसई विरार शहर महानगरपालिका
### प्रभाग समिती (एफ)धनिव/पेल्हार
### विभाग : पेल्हार

**जा. क्र. वविशम/प्रसएफ/क.वि./११४/२०२३-२४**
**दिनांक - १२/०१/२०२४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ ला अधिन राहुन या नोटीसीद्वारे वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, खालील नमुद मिळकत धारकांनी मालमत्ता हस्तांतरण कामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. उक्त फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत / तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन सात (७) दिवसांच्या आत लेखी हरकत/तक्रार कागदपत्रांसह नोंदवावी. सदर हरकत/तक्रार न आल्यास कार्यालय पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ.क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | PL 11/170 | गडग्याचापाडा | अशोक रमाशंकर उपाध्या | सुभाषचंद्र रामस्वामी गुप्ता |
| २ | PL 14/509/5 | वाकणपाडा | मोहम्मद सलीम शेख व तिर्थराज शेख | सलमा मोहम्मद सलीम शेख |
| ३ | PL 18/314/1 | सोपाराफाटा | मोहम्मद उमर खान | रामसुतर सुखई चौहान |
| ४ | PL 03/883 | पेल्हार | मकुल मोहम्मद यासीन कपूर | इंदिरा हस्तीमल मालवी |
| ५ | PL 22/807 | वंगणपाडा | शीला शिवआसरे सिंह | ऋषिकला लल्लन गिरी व कुसुम अम्बरीश |
| ६ | PL 04/885 | जाबरपाडा | भोलानाथ सिमोद पाल, सतिश रामपाल व संदिप पाल | सुनीता रामनरेश चौरसिया |
| ७ | PL 03/11828/5 | पेल्हार | रिजवान नुरमोहम्मद दावा | शाहिद अतिकुररेहमान दाऊवा |
| ८ | PL 03/1061/9 | पेल्हार | पारस जितु गुप्ता | अशोककुमार कन्हैयालाल यादव |
| ९ | PL 13/126/1 | वाण्याचापाडा | तपन बुध्दनाथ दास व १ | तुलसी तपन दास |
| १० | PL 08/624/2 | माणिचापाडा | रुपाली रुपेश कवळे | जनाकी राय अवधेश कुमार |
| ११ | PL 18/414/16 | सोपाराफाटा | सलीम अब्दुल मजीद खान | फरीदा सलीम खान |
| १२ | PL 20/678/2 | वनोठापाडा | राजु रावसाहेब माने | बिबीअन्वरी अब्दुल तलीफ खान कैसर जहाँ अब्दुल लतीफ खान |
| १३ | PL 13/223 | वाण्याचापाडा | रजाउल्ला खान मो हद्दीस खान | कौसर अब्बास मन्सुरी २०० चौ. फु. ईस्माईल कादर मन्सुरी २०० चौ. फु. |
| १४ | PL 20/739/3 | वणोठापाडा | कमलेश सुर्यमणी तिवारी | मुकेश मोतीलाल गुप्ता |
| १५ | PL 08/917/2 | माणिचापाडा | लालचंद जयनाथ शर्मा | मोहित कुमार शर्मा/अंशु शर्मा |
| १६ | PL 09/832/4 | वसईफाटा | हमीदुल्लाह दोसत मोहम्मद खान | अनवर अली अब्दुल अजीज खान |
| १७ | PL 08/1428 | माणिचापाडा | चंपा बरुन हनरा | मोहन बनवारी यादव |
| १८ | PL 16/64/77/1 | दमेलपाडा | नंदकुमार नामदेव कांबळी | सकीला खातून सुलतान मिया सुलतान नुरुल इस्लाम मिया |
| १९ | PL 03/1525/1,2,3,4 | पेल्हार | फैयाज अहमद चौधरी | होजेफा अयुब सुलीया व फुरकान अयुब सुलीया |
| २० | PL 18/77/2 | सोपाराफाटा | रामकरण सोमनाथ प्रजापती व १ | श्यामकुमारी रामकरन प्रजापती |
| २१ | PL 2/641/1 | डोंगरपाडा | असमत बी गुलामसमदानी शाह | फिरोज अब्दुल सलाम खान |

सही /-

**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (एफ)धनीव/पेल्हार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

25 x 16 .cm

## गरोदरपणात मळमळ उलट्या थांबवण्यासाठी घरगुती उपाय

**१. काळे मीठ लावून आले खा**

आल्यामध्ये काळे मीठ टाकून दाताखाली दाबल्याने या समस्येवर मात करता येते. खरं तर, आल्याचा अर्क मळमळ होण्याची भावना कमी करतो, तर मीठ पोटात आणि अन्न नळीतील ॲसिड तटस्थ करते. यामुळे मळमळ आणि उलट्या होत नाहीत.

**२. पुदिन्याची चटणी खा**

पुदिन्याची चटणी खाल्ल्यास किंवा त्याची पाने चघळल्याने गर्भधारणेची ही समस्या कमी होण्यास मदत होते. वास्तविक, पुदीनामध्ये थंड आणि आरामदायी गुणधर्म आहेत. यासह, ते पाचक एन्झाईम्सला देखील प्रोत्साहन देते, ज्यामुळे गरोदरपणात मळमळ आणि उलटीची समस्या कमी होते.



**३. लिंबाचा रस प्या किंवा लिंबू खा**

लिंबाचा रस प्यायल्याने गर्भधारणेची ही समस्या प्रभावीपणे कमी होऊ शकते. जर रस प्यावासा वाटत नसेल तर लिंबू कापून त्यावर काळे मीठ लावून चाटावे. त्यातील व्हिटॅमिन सी आणि सायट्रिक ॲसिड मळमळ कमी करण्यास मदत करतात.

**४. वेलची खा**

वेलचीमध्ये पाचक एन्झाईम्स वाढवण्याचा गुणधर्म असतो. हे चघळल्याने पोटाचा त्रास होत नाही आणि मळमळापासूनही आराम मिळतो. त्यामुळे गरोदरपणात या सर्व गोष्टी तुम्हाला त्रास देत असतील तर तुम्ही या घरगुती उपायांची मदत घेऊ शकता.



## वजन नियंत्रित ठेवायचंय?

गाजर हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे अनेकदा डॉक्टरसुद्धा गाजराचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देतात. गाजरमध्ये बीटा-कॅरोटीन असते जे एक अँटिऑक्सिडेंट असते. ज्याचा शरीराला खूप फायदा असतो. जर तुम्ही दररोज गाजराचा ज्युस पिलात तर याचा तुम्हाला पुरेपुर फायदा होणार. आज आपण याविषयीच जाणून घेणार आहोत.

दररोज एक ग्लास गाजराचा ज्युस पिणे आरोग्यासाठी उत्तम असते.

गाजराचा ज्युस पिल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. गाजर हे बीटा-कॅरोटीनचा उत्तम स्त्रोत आहे, ज्यामुळे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये बदलते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

दररोज गाजराचा ज्युस पिल्याने वजन सुद्धा नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यामुळे डाएट करणाऱ्यांनी आवर्जून गाजराचा ज्युस प्यावा. एवढंच काय तर गाजराचा ज्युस पचनशक्तीसुद्धा कमी करते.

याशिवाय गाजराचा ज्युस पिल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची लेव्हलही कमी होते.

तसेच गाजरातील बीटा-कॅरोटीनसुद्धा डोळ्यांचं आरोग्य सुदृढ ठेवते. याशिवाय कर्करोगग्रस्त रुग्णांनाही डॉक्टर गाजराचा ज्युस पिण्याचा सल्ला देतात.



## कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?

आपल्यापैकी अनेकजण स्वतः वजन कमी करण्याच्या मोहिमेवर असतील, अगदीच नाही तर अशा कोणाला ओळखत असतील जे आपल्या वजनाला घेऊन चिंतेत आहेत. अशा मंडळींना वजनापेक्षा जास्त वजन कमी करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या सल्ल्यांचा जास्त वैताग येतो. प्रत्येकाकडून वेगवेगळ्या गोष्टी ऐकताना नेमकं करावं काय हे आपल्यालाही अनेकदा कळत नाही. अशावेळी सर्वात सोपा उपाय म्हणजे डॉक्टरांचा सल्ला. आज आपण तज्ज्ञ वजन कमी करण्यासाठी ऑनलाईन दिलेल्या सल्ल्याची डॉक्टरांनी केलेली पडताळणी जाणून घेणार आहोत. हा व्हायरल सल्ला म्हणजे कॉफी व लिंबू एकत्र पिणे. आजवर आपण लेमन टी हा प्रकार ऐकला असेल पण लेमन कॉफी म्हणजे काय व खरंच याचा फायदा वजन कमी करण्यासाठी होऊ शकतो का हे जाणून घेऊयात.

**कॉफीच्या सेवनाने वजन कमी होते का?**

कविता सांगतात की, तुम्ही एक पॅकेट चिप्स खाण्याआधी जर एक ग्लास पाणी प्यायलात तर तुमची भूक झटपट कमी होते. जर तुम्ही दोन ग्लास पाणी प्यायलात तर तुम्हाला काही खाण्याची इच्छाही होत नाही. ७० ते ८० या दशकात अनेक मॉडेल्स रॅम्प वॉकआधी कॉफी प्यायच्या.

कॉफीमुळे आपल्या शरीरातील बेसल मेटाबॉलिक रेट (BMR) वाढतो. कॅफिन न्यूरोट्रांसमीटर एडेनोसिन ला ब्लॉक करण्याचे काम करतो तसेच डोपामाइन या न्यूरोट्रांसमीटरला वाढवण्यास मदत करते. जर आपल्याला मेटाबॉलिक रेट अधिक वाढवायचा असेल तर एका दिवसात अधिकाधिक कॉफीचे सेवन करावे लागेल पण असे केल्याने आपल्या स्वास्थ्यावर अगदीच विपरीत परिणाम होऊ शकतो.

**लिंबाच्या सेवनाने वजन कमी होते का?**

वजना कमी करण्यासाठी अनेक तज्ज्ञ लिंबू पाणी पिण्याचा सल्ला देतात. कविता सांगतात की, लिंबामध्ये व्हिटॅमिन सी, अँटी ऑक्सिडंट्स, फोलेट व अन्य खनिजे असतात, यामुळे आपल्या शरीराला डिटॉक्स करण्यात मदत होऊ शकते. याशिवाय कोलेस्ट्रॉल कमी करण्यास सुद्धा यामुळे मदत होऊ शकते. लिंबू पाणी प्यायल्यावर त्यातील क्षार आपला पोटाच्या विकारांपासून बचाव करू शकतात. तर शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी सुद्धा याची मदत होते.

**कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?**

दरम्यान, कॉफी व लिंबू यांचे अलिप्त फायदे असले तरी एकत्र त्यांचे सेवन केल्याने तुमचे वजन कमी होईलच याची काही शाश्वती नाही. आहारतज्ज्ञ कविता देवगन यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, कॉफी व लिंबू आपल्याला वजन कमी करण्यास मदत करू शकतील याचे काही ठोस पुरावे नाहीत पण या पेयाच्या सेवनाने आपली भूक नियंत्रणात राहते किंबहुना कमी होते. जेव्हा तुम्ही कॅफिनचे सेवन करता तेव्हा अधून मधून लागणारी छोटी भूक कमी होते व सतत खात राहण्याची इच्छा मिटते. त्यामुळे व्हायरल ट्रिक्सच्या अंधानुकरणाला बळी पडू नका.

## पनीर खाण्याचे फायदे

प्रत्येक जण नवीन वर्षात नवनवीन निर्धार करत असतात. अशात अनेकजण आरोग्याच्या दृष्टीने वजन कमी करण्याचाही निर्धार करतात. आज आम्ही तुम्हाला वजन कमी करण्यासाठी एक सोपा उपाय सांगणार आहोत.

वजन कमी करायचं असेल तर तुम्ही पर्याय म्हणून पनीर खाऊ शकता. कारण पनीर हा उत्तम पर्याय आहे. चला तर सविस्तर जाणून घ्या.

पनीर हा अनेकांना आवडणारा पदार्थ आहे. अनेकदा जेवणाच्या अनेक मेन्युमध्ये पनीरचा समावेश केला जातो. पनीर हा आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच फायदेशीर आहे. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रोटीन देणारा उत्तम पर्याय आहे.

त्यात जर तुम्ही वजन कमी करण्याचा विचार करत असाल तर प्रोटीन तुम्ही खायलाच हवं. पनीरमध्ये प्रोटीन्ससह, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम आणि फॉस्फरस असतात जे शरीरासाठी खूप फायदेशीर असतात.



**पनीर खाण्याचे फायदे**

पनीरमध्ये प्रोटीनचे प्रमाण अधिक असते. जर तुम्ही आहारात पनीरचा समावेश करत असाल तर उत्तम पर्याय आहे.

पनीर हे लो कॅलरीयुक्त पदार्थ आहे. त्यामुळे कमी कॅलरी असलेले पनीर वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.

जर तुम्ही डाएट करत असाल तर तुम्ही पनीर खाऊ शकता. शरीराला हेल्दी फॅट देण्यास पनीर उत्तम पर्याय आहे.

पनीरमध्ये असलेले कॉंजुगेटेड लिनोलिक ॲसिड चरबी जाळण्यास मदत करते. ज्यामुळे वजन आपोआप कमी होते.

पनीर खाल्याने भूक कमी होते त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

## कमी रक्तदाबाच्या समस्येवर दूध ठरेल रामबाण उपाय

रोजच्या धावत्या आयुष्यात दोन मिनिट बसायला ज्यांना वेळ नाही त्यांना टेन्शन घेऊ नका असं आम्ही सांगणार नाही. मुळात कोणी सांगितल्याने तुमचा तणाव जाणार नाही त्यासाठी आपणच स्टेप बाय स्टेप काम करणे गरजेचे आहे. मात्र हे तणाव विनाकारण रोगांना आमंत्रण देतात त्यातील एक सर्वात घातक रोग म्हणजे ब्लड प्रेशरमध्ये असंतुलन. साधारण ९०/६० mmHg ते १२०/८० mmHg दरम्यान असणारा रक्तदाब हा परफेक्ट मानला जातो. याहून अधिक किंवा कमी रक्तदाब हा आरोग्यासाठी घातक असतो. जर का आपल्याला वारंवार टेन्शन घेतल्याने सतत रक्तदाब कमी झाल्याची तक्रार सतावत असेल तर आज आपण एक घरगुती सोपा उपाय पाहणार आहोत. लक्षात घ्या तणाव सोडून आनंदी राहणे हा रक्तदाबावरील सर्वात सोपा उपाय आहे मात्र इन्स्टंट त्रास होत असेल तर थंड दूध हा तुमचा घरचा रामबाण उपाय ठरेल. हाडांची मजबुती ते शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळण्यासाठी गरम किंवा कोमट दूध घेण्याचा सल्ला दिला जातो. मात्र कमी रक्तदाबाच्या समस्येवर थंड दुधाचे सेवन अधिक फायदेशीर ठरते.

**थंड दुधाचे फायदे –** थंड दुधात पोटेशियम, फॉस्फोरस, विटामिन व कॅल्शियमचे प्रमाण भरपूर असते. अमेरिकन हार्ट एसोसिएशनच्या माहितीनुसार रक्तदाब कमी झाल्यास थंड दुधातील पोटॅशियम प्रेशर संतुलित करण्यास मदत करते थंड दुधामुळे शरीर हायड्रेटेड राहण्यास मदत होते उपवासाच्या दिवशी विशेषतः थंड दूध प्यावे ज्याने वारंवार भूक लागणे बंद होते.

याशिवाय थंड दुध चेहऱ्याला लावल्यास त्वचेला सुद्धा फायदा होतो. नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ हेल्थ च्या माहितीनुसार थंड दुधातील कोलाईन आपल्या शरीराला आवश्यक पोषक तत्व देतात ज्यामुळे स्मरणशक्ती व मूड चांगला राहण्यास मदत होते. मूड हलका राहिल्यास लॉन्ग टर्म मध्ये सुद्धा तणाव कमी व्हायला व रक्तदाब संतुलित राहायला मदत होते.




## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**

**मुख्य कार्यालय – विरार,**

दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

**जा. क्र. वविशम /कर/१३३/२०२३-२४**

**दिनांक -१८/०१/२०२४**

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | दिनांक | अनुसुचित दोन/तीन मधील नोटिसीची मालमत्ता क्र. | वॉर्ड क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 29-12-23 | 1847/79 | 06 | साधना दगडू चिल्ले | वैभव दत्ताराम गार्डी / अनुष्का वैभव गार्डी |
| 2 | 29-12-23 | 1803/14 | 06 | शिला मनोहर मनवे | रुपाली श्रीधर पवार |
| 3 | 29-12-23 | 1804/57 | 06 | अशोक रामजी तांदले | निलेश अनंत थोरे / निधि निलेश थोरे |
| 4 | 29-12-23 | 301/3 | 06 | शकुंतला शशिकांत आधागले | रोहिदास अशोक भंगाले |
| 5 | 02.01.24 | 1341/94 | 06 | राजेंद्र पांडुरंग पवार | रुपाली संजय मुळम |
| 6 | 01.01.24 | 2131/49 | 06 | साईनाथ इंटरप्राइजेस | सुदेश विठ्ठल सकपाळ |
| 7 | 01.01.24 | 2011/11 | 06 | समीर सुहास खापरे | श्रीपत मानाजी लाड/अमृता श्रीपत लाड |
| 8 | 01.01.24 | 2180/16 | 06 | सय्यद नुरुल हलिमा | रसिका रविंद्र साळवी |
| 9 | 01.01.24 | 1966/69 | 06 | योगेश आ.तांबे/ अनिता तांबे | योगेश आनंद तांबे |
| 10 | 01.01.24 | 1787/165 | 06 | नंदा चव्हाण / राखी रणधीर वासुदेव | राखी रणधीर वासुदेव |
| 11 | 01.01.24 | 1513/71 | 06 | जयेश चंद्रशेखर कपूर | विजय सखाराम कणेरी / स्वेता विजय कणेरी |
| 12 | 01.01.24 | 1072/14 | 06 | दिव्या डी. परब | अमित प्रकाश भोगले/आराध्या भोगले |
| 13 | 01.01.24 | 1949/5 | 06 | जितेंद्र विजय आग्रे | अक्षत चंद्रकांत गमरे |
| 14 | 01.01.24 | 1454/20 | 06 | गीतेश किशोर नांदगावकर | अनिल रघुनाथ पवार / निशा अनिल पवार |
| 15 | 01.01.24 | 2237/61 | 06 | यशफ्रा बिल्डर्स अँड डेव्हलपर्स | दिलीप आप्पा भोगूलकर |
| 16 | 01.01.24 | 1748/33 | 06 | नरेश तुकाराम सावंत | नेहा नरेश सावंत |
| 17 | 01.01.24 | 1783/89 | 06 | नारायण शांताराम परब / आदिती परब | बुधाराम चौधरी / सोनी बुधाराम चौधरी |
| 18 | 01.01.24 | 1422/38 | 06 | राकेश जितनारायन तिवारी | संतोष हरी मळेकर / साक्षी संतोष मळेकर |
| 19 | 01.01.24 | 1468/2 | 06 | राजेंद्र धोंडू गुजर | सोनिया अरुण पाटील |
| 20 | 01.01.24 | 2249/32 | 06 | दिपक रमाकांत तिवारी | रितेश जयवंत साळवी / ज्योति जयवंत साळवी |

**सही /-**

**प्र. सहा. आयुक्त**
**प्रभाग समिती (बी) विरार पूर्व**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. १, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, गजाराम को. ऑ.हौ.सो. चंदनवाडी, नवघर रोड, शनी मंदिर जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत) संपर्क:-9594418181 / 8424989898